महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार



छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ३०६ वे | दिनांक : ०३/११/२०२६ | वार : मंगळवार

अजितदादा असते तर घात करण्याची कुणाची हिंमत झाली असती का ? सतीश चव्हाण



छत्रपती संभाजीनगर : विधानपरिषद निवडणुकीत मराठवाडा पदवीधर मतदारसंघातून पराभवाचा सामना करावा लागल्यानंतर माजी आमदार सतीश चव्हाण यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधत आपली भूमिका स्पष्ट केली. या पराभवाला त्यांनी साधा राजकीय पराभव न मानता घात झाल्याचे म्हटले आहे. तसेच या निवडणुकीतील सर्वात मोठा टर्निंग पॉईंट म्हणजे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांची अनुपस्थिती असल्याचे त्यांनी सांगितले. 'अजितदादा असते तर घात करण्याची कुणाची हिंमत झाली असती का?' असा सवाल करत त्यांनी अप्रत्यक्षपणे महायुतीतील काही नेत्यांच्या भूमिकेवर नाराजी व्यक्त केली.

पराभवानंतर सतीश चव्हाण यांनी कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्याला मराठवाड्यातील विविध जिल्ह्यांमधील पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. आमदार विक्रम काळे यांचीही यावेळी उपस्थिती होती. निवडणुकीच्या निकालानंतर कार्यकर्त्यांशी संवाद साधताना चव्हाण यांनी प्रचारातील त्रुटी, विरोधकांची रणनीती, महायुतीतील अंतर्गत विरोध आणि अजित पवार यांच्या अनुपस्थितीचा निवडणुकीवर झालेला परिणाम अशा विविध मुद्द्यांवर भाष्य केले.

कार्यकर्त्यांशी संवाद साधताना सतीश चव्हाण म्हणाले, की नेमके काय बोलावे आणि कुठून सुरुवात करावी, हे समजत नाही. अनेक कार्यकर्त्यांना भेटायचे होते आणि त्यांच्याशी संवाद साधायचा होता. त्यामुळे हा मेळावा आयोजित केला. मात्र, झालेला पराभव आपल्याला मान्य नसल्याचे सांगत त्यांनी हा घात असल्याची भावना व्यक्त केली.

निवडणुकीच्या प्रचाराचे तंत्र बदलत असल्याचे आपण यापूर्वीही सांगितले होते. आपण पारंपरिक पद्धतीने काम करत राहिलो; मात्र विरोधकांनी बदललेल्या प्रचारतंत्राचा प्रभावी वापर केला. त्यामुळे काहीतरी गडबड होऊ शकते, याचा अंदाज असूनही आपण त्याकडे गांभीर्याने लक्ष दिले नाही, अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

'मी १८ वर्षे काम केले, हीच माझी चूक वाटते. अवघे १५ दिवस काम करून काही लोकांना ८० हजार मते मिळाली. याचा हिशेब आपण योग्य वेळी घेऊ,' असे म्हणत त्यांनी निवडणुकीतील बदललेल्या समीकरणांकडे लक्ष वेधले.

आपल्या राजकीय प्रवासाबद्दल बोलताना चव्हाण यांनी १८ वर्षांच्या कार्यकाळाचा उल्लेख केला. दीर्घकाळ काम करताना काही कामे अपूर्ण राहिली असतील किंवा काही ठिकाणी उणिवा राहिल्या असतील; मात्र आपण कधीही चुकीचे काम केले नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

या पराभवासाठी कोणालाही दोष देण्याऐवजी त्याची जबाबदारी स्वत:वर घेत असल्याचेही त्यांनी सांगितले. 'जो पराभव झाला, तो माझ्यामुळे झाला, असे मी समजतो. माझा कोणावरही राग नाही. कार्यकर्त्यांनी मला १८ वर्षे साथ दिली. आज निकाल आपल्या बाजूने लागला नसला तरी त्यांनी दाखवलेला विश्वास आणि दिलेले प्रेम मी आयुष्यभर विसरणार नाही,' असे ते म्हणाले.

काही मतदारांना आपला कामाचा प्रवास पटला नसेल किंवा नवीन चेहऱ्याला संधी देण्याच्या विचारातून त्यांनी वेगळा निर्णय घेतला असेल, अशी शक्यताही चव्हाण यांनी व्यक्त केली. मात्र, योग्य व्यक्तीला संधी मिळायला हवी होती, अशी खंत त्यांच्या मनात असल्याचे त्यांनी सांगितले.

या निवडणुकीतील पराभवाचे विश्लेषण करताना सतीश चव्हाण यांनी अजित पवार यांच्या अनुपस्थितीचा मुद्दा उपस्थित केला. त्यांच्या मते, या निवडणुकीतील सर्वात मोठा टर्निंग पॉईंट म्हणजे अजितदादा नसणे हा होता.

'अजितदादा असते तर कुणाची हिंमत झाली असती का घात करण्याची? दादा असते तर विश्वास तोडण्याची कोणाचीच हिंमत झाली नसती,' असे म्हणत त्यांनी निवडणुकीत झालेल्या कथित दगाबाजीवर नाराजी व्यक्त केली.

दरम्यान, पराभवानंतर आपण राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या सुनेत्रा पवार यांची भेट घेतल्याचेही त्यांनी सांगितले. या भेटीत सुनेत्रा पवार यांनी आपल्याला धीर दिला. 'सतीशराव, तुमची तर एक निवडणूक झाली; माझी तर रोज निवडणूक आहे. दादा नाहीत, मी कसं करत असेल,' असे सुनेत्रा पवार म्हणाल्याचे चव्हाण यांनी कार्यकर्त्यांना सांगितले.

कर्जमाफीच्या यादीतून कोणीही सुटणार नाही : मंत्री चंद्रशेखर बावनकुळेंची ग्वाही



अमरावती : राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केले आहे की, कर्जमाफीच्या यादीतून एकाही शेतकऱ्याचे नाव सुटणार नाही आणि या निर्णयाची शासनाकडून संपूर्ण अंमलबजावणी केली जाईल. सध्या प्रत्येक जिल्ह्यात १० ते १५ हजार शेतकरी कुटुंबांची केवायसी प्रक्रिया पूर्ण झालेली नाही ही वस्तुस्थिती त्यांनी मान्य केली. मात्र केवायसी पूर्ण करून लाभार्थींच्या याद्या तातडीने पुढे पाठवण्याचे काम वेगाने सुरू असल्याचेही बावनकुळे यांनी सांगितले.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, मृत आई-वडिलांच्या नावाने अकाऊंट आहे, ते मुलाच्या नावाने करणे यासाठी वेळ लागत आहे. शेतकरी कर्जमाफीची योजना आम्ही पूर्ण करू, कोणालाही सोडणार नाही, असे आश्वासन बावनकुळे यांनी दिले आहे. तसेच राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाच्या नेत्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची दिल्लीत जाऊन भेट घेतली. यावर विचारले असता बावनकुळे यांनी सांगितले की, उच्चस्तरीय बैठक झाली असेल, त्यात जे ठरले असेल त्यावर आमचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि वरिष्ठ नेते बसून निर्णय घेतील.

दरम्यान, नागपूर येथील सराफा व्यापाऱ्यांना बिश्नोई गँगने धमकी दिली आहे. यावर प्रतिक्रिया देताना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, मुख्यमंत्र्यांनी याची दखल घेतली आहे. यावर आम्ही कारवाई करत आहोत. तसेच मंत्री झिरवाळ यांनी तुकाराम मुंढे यांच्या रांजणगाव येथील कंपणीवरील कारवाईला स्थगिती दिली आहे. यावर प्रतिक्रिया देताना बावनकुळे यांनी सांगितले की, कुठल्याही दबावाखाली स्थगिती होत नाही, एखाद्या वेळी कारवाईमध्ये तांत्रिक बाबी राहून जातात त्यामुळे स्थगिती मिळते, अशी स्थगिती कोणाला देता येत नाही. तुकाराम मुंढे यांचे तपासणीत काही आले असेल, काही बाबी राहून गेल्या असतील म्हणून थांबवले असेल. तसे कोणी मुंढे यांना थांबवत नाही, त्यांच्या कारवाईमध्ये कोणी येत नाही, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले आहे.

दरम्यान, फायनान्स कंपण्यांकडून सक्तीने वसूली केल्याचे प्रकरण समोर आले आहे. तसेच नांदेड येथे दोन शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचेही समोर आले आहे. यावर प्रतिक्रिया देताना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, दुष्काळाच्या आठ महिन्यात शेतकऱ्यांना तगादा लावू नका, पतसंस्था फायनान्स कंपन्या खासगी बँका कोणीही शेतकऱ्यांना वेठीस धरू नका. तुमचे पैसे नंतर भेटतील पण शेतकऱ्यांना या काळात त्यांच्या आत्महत्या होतील असे काही करू नका अशा सूचना दिल्याची माहिती बावनकुळे यांनी दिली आहे. तसेच जर कोणी असे करत असेल तर शासन म्हणून कारवाई करू, असेही त्यांनी म्हटले आहे.

तसेच जिल्हा परिषद निवडणुकांमधील ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून चंद्रशेखर बावनकुळे यांनी कॉंग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांच्यावर टीका केली आहे. ते म्हणाले, विजय वडेट्टीवार नौटंकी करत आहेत. ते २७ टक्के आरक्षण कुठे गेले? २७ टक्के आरक्षण उद्धव ठाकरे यांच्या काळात गेले. विजय वडेट्टीवार खोटारडेपणा करत आहेत. २७ टक्के आरक्षण परत मिळण्यासाठी देवेंद्र फडणवीस यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली असून २७ टक्केचा निर्णय होत राहील, पण ५० टक्के आरक्षण घेऊन निवडणुका घ्या, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले, सरकार तशी तयारी करत असल्याची माहिती बावनकुळे यांनी दिली आहे.

संभाजीनगरमधील नायगाव प्रकल्पासाठी १ लाख झाडांचा बळी?: हा प्रकल्प तात्काळ रद्द करा - अंबादास दानवे

छत्रपती संभाजीनगर : 'रयतेच्या भाजीच्या देठाला हात लावू नये' या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकत्याच केलेल्या विधानाचा समाचार घेत, शिवसेना (ठाकरे गट) नेते आणि विधान परिषदेचे आमदार अंबादास दानवे यांनी राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सोयगाव तालुक्यात प्रस्तावित असलेल्या 'नायगाव जलविद्युत प्रकल्पा'साठी तब्बल 1 लाखांहून अधिक झाडांची कत्तल केली जाणार असल्याचा आरोप करत, हा 'फडतूसपणा' सहन केला जाणार नाही, असा थेट इशारा दानवे यांनी दिला आहे.

यासंदर्भात त्यांनी 30 ऑक्टोबर 2026 रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना एक सविस्तर पत्र लिहून हा प्रकल्प तात्काळ रद्द करण्याची मागणी केली आहे. अंबादास दानवे यांनी आपल्या सोशल मीडिया पोस्टमध्ये आणि मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या पत्रात या प्रकल्पातील पर्यावरणीय धोके आणि प्रशासकीय विरोधाभास उघड केला आहे.

•1 लाखांहून अधिक झाडांची कत्तलसोयगाव तालुक्यातील प्रस्तावित 'नायगाव जलविद्युत प्रकल्पा'साठी जवळपास 750 एकर वनजमीन प्रस्तावित करण्यात आली आहे. या प्रकल्पाच्या कागदपत्रांनुसार येथे किमान एक लाखाहून अधिक झाडांची कत्तल केली जाण्याची शक्यता आहे, ज्यामुळे मराठवाड्याची 'ग्रीन वॉल' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ऐतिहासिक अजिंठा डोंगररांगांवर विनाशकारी घाव घातला जाईल, अशी भीती दानवे यांनी पत्रात व्यक्त केली आहे. मराठवाड्याच्या फुफ्फुसा समान असलेल्या या डोंगररांगांचा विनाश राज्याच्या हिताचा नाही, असे त्यांनी नमूद केले आहे.

•वनविभागाचा 'नॉट रिकमेंडेड' अभिप्रायविशेष म्हणजे, या प्रकल्पाला खुद्द वनविभागाचा विरोध आहे. 2021 मध्ये तत्कालीन वन अधिकाऱ्यांनी आपल्या अहवालात स्पष्ट केले होते की, अजिंठा डोंगररांगेत वन्यप्राण्यांचा मुक्त अधिवास असून हा भाग 'टायगर कॉरिडॉर'चाही भाग आहे. तसेच प्रस्तावित प्रकल्पापासून गौताळा अभयारण्य केवळ 7 ते 8 किमी हवाई अंतरावर असल्याने हा परिसर प्रकल्पमुक्त असणे गरजेचे आहे. याच कारणामुळे उपवनसंरक्षक कार्यालयाने या प्रकल्पास 'नॉट रिकमेंडेड' (प्रकल्प उभारण्यास शिफारस नामंजूर) असा स्पष्ट अभिप्राय दिला होता, याकडे दानवे यांनी लक्ष वेधले आहे.

•ग्रामपंचायतीचाही विरोधकेवळ वनविभागच नाही, तर स्थानिक पातळीवरही या प्रकल्पाला कडाडून विरोध होत आहे. हा प्रकल्प नको म्हणून स्थानिक ग्रामपंचायतीने देखील तसा ठराव मंजूर केला असल्याची माहिती दानवे यांनी मुख्यमंत्र्यांना दिलेल्या पत्रात दिली आहे.

•मानव-वन्यजीव संघर्षाचा धोकाया प्रकल्पामुळे वन्यजीवांचे नैसर्गिक कॉरिडोअर नष्ट होऊन भविष्यात मानव-वन्यजीव संघर्ष वाढण्याची आणि परिसंस्थेचा समतोल बिघडण्याची दाट शक्यता दानवे यांनी व्यक्त केली आहे.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०३ नोव्हेंबर २०२६

पी.डब्ल्यू.एस. महाविद्यालयात शिक्षक-पालक सभेचे आयोजन



नागपूर (डॉ. चंद्रशेखर पाटील) : येथील पी.डब्ल्यू.एस. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शिक्षक-पालक समितीच्या वतीने शिक्षक-पालक सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या माजी कार्यकारी प्राचार्या डॉ. प्रज्ञा बागडे उपस्थित होत्या.सभेच्या मार्गदर्शनपर सत्रात प्रा. डॉ. मनिषा नागपुरे (मराठी विभागप्रमुख), प्रा. डॉ. सुदेश भोवते (इंग्रजी विभागप्रमुख), प्रा. डॉ. विवेक चव्हाण (वाणिज्य विभागप्रमुख) आणि प्रा. डॉ. अमोल मेढे (इंग्रजी विभाग) यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.यावेळी मार्गदर्शकांनी शिक्षक-पालक सभेचे महत्त्व विशद करताना सांगितले की, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्यांच्यात रोजगाराभिमुख कौशल्ये विकसित करण्यासाठी अशा सभा महत्त्वपूर्ण ठरतात. विद्यार्थ्यांमध्ये चांगले संस्कार रुजवणे, सार्वजनिक जीवनात योग्य प्रकारे वागण्याची शिकवण देणे तसेच सामाजिक आणि सांस्कृतिक जाणीव निर्माण करणे आवश्यक आहे.सध्याच्या काळात रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध असून, त्या संधींचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये आवश्यक कौशल्ये विकसित करणे आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास घडवणे गरजेचे आहे. या उद्देशाने महाविद्यालयात विविध कौशल्यविकास व व्यक्तिमत्त्व विकासाचे उपक्रम राबविण्यात येतात. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी महाविद्यालयात अनुभवी प्राध्यापकांकडून योग्य मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जाते, असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी पालकांनी शिक्षक-पालक समितीमध्ये विद्यार्थ्यांच्या पालकांचा समावेश करण्यात यावा, अशी सूचना मांडली. शिक्षक आणि पालक यांच्यातील समन्वयातून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व वैयक्तिक विकासाला अधिक चालना मिळू शकते, असा विचारही यावेळी व्यक्त करण्यात आला.कार्यक्रमाचे संचालन प्रियका मेश्राम, शिक्षक-पालक समितीचे समन्वयक डॉ. चंद्रशेखर पाटील प्रास्ताविक तर डॉ. अमृता मासुरकर यांनी आभार प्रदर्शन केले.या कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापकवृंद आणि पालक उपस्थित होते.

भारतरत्न राजीव गांधी कनिष्ठ महाविद्यालयात इंदिरा गांधी व सरदार पटेल यांना अभिवादन



बिल्डा : भारतरत्न राजीव गांधी कनिष्ठ महाविद्यालय बिल्डा , येथे देशाच्या पहिल्या महिला पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या स्मृती दिनानिमित्त व देशाचे लोह पोलाद पुरुष सरदार वल्लभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त आज महाविद्यालयात विशेष या दोन्ही कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यावेळेस या दोन महापुरुष यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले....या प्रसंगी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी विद्यार्थीनी मोठ्या संख्येने कार्यक्रमास उपस्थित होते.

यावेळेस माजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी व सरदार वल्लभाई पटेल यांनी केलेल्या देशहीता भिमुख कल्याणकारी कार्याचा व त्यांचा देशाच्या जडन घडनी मध्ये कसे उल्लेखनीय कार्य राहीले या विविध विषयांवर आपले मनोगत प्रा.संतोष पुंडगे यांनी व्यक्त केले.

प्रत्येकाला असावे

कर्तव्याची जाणीव,
प्रत्येकालाच असावे.
कर्तव्य करताना कधी,
कामात दुर्लक्ष नसावे. १

अधिकार गाजवतांना,
कर्तव्याची जाणीव ठेवा.
हक्क अधिकारासोबत,
समाजाची करावी सेवा. २

अधिकार व कर्तव्याची,
सरमिसळ कशाला करता.
कर्तव्याला फाटा देऊन,
लोकांना का दम भरता ? ३

कर्तव्याप्रती जागरूक,
प्रत्येक नागरिक रहावे.
हक्क अधिकाराचे रक्षण,
संविधानात सदैव पहावे. ४

संविधानाने दिले तुम्हाला,
जीवन जगण्याचे भान.
भारतीय म्हणून जगतांना,
ठेवा प्रत्येक धर्माचे मान. ५

जगतांना सर्वांनी ठेवावी,
सदैव कर्तव्याची जाणीव.
भासणार नाही कधीच,
कोणाला कशाची उणीव. ६



नागेश बोंतेवाड
छत्रपती संभाजीनगर

प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103

प्रदीप सोपानराव कोकडवार यांना आदर्श राष्ट्र भूषण राष्ट्रीय पुरस्कार जाहीर



जिंतूर (बी. डी. रामपूरकर) : राष्ट्रभक्ती परिवार, ग्रेट पिपल सोशल फाउंडेशन आणि राष्ट्र भूषण न्यूज यांच्या वतीने दिला जाणारा मानाचा 'आदर्श राष्ट्र भूषण राष्ट्रीय पुरस्कार' जिंतूरचे सुपुत्र मा. श्री. प्रदीप सोपानराव कोकडवार यांना जाहीर झाला आहे.सर्वसमावेशक सामाजिक कार्य क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल त्यांची या राष्ट्रीय पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

पुणे येथे झालेल्या मंगल सोहळ्यात सौ. भारती तुपे, सौ. प्रियांका आवनावे आणि श्री. सुनील गोरे यांच्या हस्ते त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला. प्रदीप कोकडवार हे सध्या महाराष्ट्र आर्य वैश्य महासभा - राज्य संघटन प्रमुख म्हणून कार्यरत असून, जिंतूरला रेल्वे आलीच पाहिजे या मोहिमेचे संयोजक देखील आहेत. त्यांच्या या गौरवाबद्दल जिंतूरसह सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०३ नोव्हेंबर २०२६

अरविंद सासट्टे व रवी कल्पे यांना शिवाचा राष्ट्रीय पुरस्कार जाहीर





अतनुर (प्रा. सुधीर पंचगल्ले) : शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेच्या वतीने प्रतिवर्षी कार्तिक शुध्द पौर्णिमेच्या निमित्त श्री क्षेत्र कपिलधार, ता. जि. बीड येथे होणाऱ्या यात्रेमध्ये 'शासकीय महापुजा' व 'भव्य राज्यव्यापी वार्षिक मेळावा' आयोजित केला जातो. श्री क्षेत्र कपिलधार येथे शिवा संघटनेच्या प्रथेप्रमाणे विविध क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्कार दिले जातात. त्यामुळे यंदाही दि. 24 नोव्हेंबर 2026 मंगळवारी 31 व्या राज्यव्यापी वार्षिक मेळाव्याचे आयोजन केले असुन या मेळाव्याच्या निमित्ताने शिवा संघटनेच्या वतीने राष्ट्रीय स्तरावरील विविध क्षेत्रातील वीरशैव - लिंगायत समाजाच्या मान्यवरांना 'शिवा राष्ट्रीय भुषण पुरस्कार' जाहिर करुन, सन्मान चिन्ह व सन्मान पत्रासह मान्यवरांच्या हस्ते त्यांचा शाल, श्रीफळ देवुन श्री क्षेत्र कपिलधार येथे यथोचित सत्कार करण्यात येणार आहे. देशातील वीरशैव - लिंगायत समाजात अत्यंत प्रतिष्ठेचा समजल्या जाणाऱ्या शिवा संघटनेच्या या राष्ट्रीय भुषण पुरस्कारांसाठी विविध क्षेत्रातील मान्यवरांची निवड 'शिवा' संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे सर यांनी नुकतीच जाहिर केली आहे. त्यात अतनुर ता.जळकोट येथील समाजभुषण माजी सैनिक अरविंद सासट्टे यांना जाहिर झाला असुन तेदेश सेवा ते समाज सेवा... एक अविरत प्रेरणादायी प्रवास!अत्यंत अभिमानास्पद बाब! १९ वर्षे भारतीय सैन्यात देश सेवेमध्ये कर्तव्य बजावून, मातृभूमीचे रक्षण केल्यानंतर, तितक्याच तडफेने सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात स्वतःला झोकून देणारे आमचे मार्गदर्शक, मित्र अरविंदजी सासटे यांना 'शिवा राष्ट्रीय उत्कृष्ट पुरस्कार' मिळाल्याबद्दल मन:पूर्वक अभिनंदन!१९ वर्षे अखंड देश सेवा ıकेली तसेच तळागाळातील लोकांसाठी सामाजिक कार्यात मोलाचे योगदान देत आहेत. त्यांचे लोकाभिमुख राजकीय कार्यातही त्यांचा सहभाग महत्वाचा आहे. या कार्याची दखल घेऊन हा सन्मान आम्हा सर्व मित्र परिवाराची अतनुर गावाची मान अभिमानाने उंचावणारा आहे. सैन्यातील शिस्त आणि समाजाप्रती असलेली निष्ठा या दोन्हीचा संगम त्यांच्या कार्यातून दिसतो. या सर्वोच्च बहुमानाबद्दल खूप खूप शुभेच्छा आणि पुढील सामाजिक-राजकीय वाटचालीस मित्र परिवाराकडून व समाजाकडुन अनंत शुभेच्छा!तसेच दुसरे समाजभुषण रवी कल्पे हे शिवा संघटनेचे कुशल संघटक व मार्गदर्शक म्हणुन कार्य करत आहेत.दर सोमवारी शिवपाठ, महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या स्मारकाची आरती, आतनुर ते कपीलाधार महापदयाञेचे आयोजन व नियोजन, मासिक शिव रात्री व ग्रंथराज परमरहस्य पारायण, सर्व धर्मीय अखंड शिवनाम सप्ताह व राष्ट्रसंत शिवलिंग शिवाचार्य महाराज यांच्या जन्मोत्सव समाधी सोहळा याचे विशेष कार्यक्रम आयोजित करतात.जगतज्योती महात्मा बसवेश्वरांचे विचार समाजामधे रुजविण्याचेही काम ते आपल्या कार्यातुन सतत करत असतात.या कार्याची दखल घेऊन त्यांनाही शिवा राष्ट टीय पुरस्कार जाहिर झाला असुन अतनुर परिसरांत गांवक-याकडुन अभिनंदनाचा वर्षाव होताना दिसतो आहे. अशा प्रकारे "शिवा राष्ट्रीय भुषण पुरस्कार" शनिवार 31 ऑक्टोबर 2026 ला घोषित करण्यात आले असुन या पुरस्कार प्राप्त मान्यवरांचा सत्कार मंगळवार 24 नोव्हेंबर 2026 श्री क्षेत्र कपिलधार ता. जि. बीड येथे शिवा संघटनेच्या होणाऱ्या 31 व्या राज्यव्यापी वार्षिक मेळाव्यात सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व शाल - श्रीफळ देवून शिवा संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे व अनेक गुरुवर्य आणि पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री ना. सुनेत्रा पवार, ना. पंकजा मुंडे, ना. अतुल सावे, माजी मंत्री आ. धनंजय मुंडे, माजी विरोधी पक्ष नेते आ. विजय वडेट्टीवार यांच्यासह इतर मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे. अशी माहिती प्रसिद्धी पत्रकातून शिवा संघटनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष श्री. अभयराव कल्लावार नागपूर व राष्ट्रीय सरचिटणीस श्री. उमाकांतआप्पा शेटे पुणे यांनी दिली आहे.

रूपालीताई शिवाजी शिंदे यांना सामाजिक क्षेत्रातील योगदानाबद्दल राष्ट्रीय गरुड झेप पुरस्काराने सन्मानित



मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) : सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय व निस्वार्थ कामगिरी केल्याबद्दल, उमरगा तालुक्यातील मुरूम येथील सामाजिक कार्यकर्त्या रूपालीताई शिवाजीराव शिंदे यांना राष्ट्रीय पातळीवरील प्रतिष्ठित ' गरुड झेप सामाजिक पुरस्कार ' प्रदान करण्यात आला आहे. पंढरपूर येथील सिंहगड इन्स्टिट्यूट सभागृहात पार पडलेल्या एका दिमाखदार सोहळ्यात त्यांना हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. या विशेष सोहळ्यात , यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सन्मान सोहळा पार पडला. शिंदे यांना या मान्यवरांच्या हस्ते स्मृतीचिन्ह, गौरवपत्र प्रदान करून गौरविण्यात आले. सौ. रूपालीताई शिंदे या गेल्या अनेक वर्षांपासून मुरूम, उमरगा परिसर तसेच संपूर्ण धाराशिव जिल्ह्यात सामाजिक कार्यात सक्रिय आहेत. अत्यंत सामान्य कुटुंबातीलतून संघर्ष करत सामाजिक क्षेत्रात मोठे योगदान देऊन त्यांनी आपले सामाजिक भान जपले आहे. समाजातील वंचित, गरीब, अनाथ आणि संकटग्रस्त घटकांना त्यांनी नेहमीच मदतीचा हात दिला आहे. नैसर्गिक आपत्तीच्या काळात किंवा वैयक्तिक अडचणीत सापडलेल्या नागरिकांच्या मदतीसाठी ते सातत्याने अग्रेसर असतात.त्यांच्या याच निस्वार्थ आणि अविरत लोकसेवेची दखल घेऊन त्यांना या राष्ट्रीय सामाजिक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. धाराशिव जिल्ह्यात आनंदाचे वातावरण सौ. रूपालीताई शिंदे यांना मिळालेला हा राष्ट्रीय पुरस्कार केवळ त्यांच्या वैयक्तिक कार्याचा गौरव नसून, ग्रामीण भागात प्रामाणिकपणे झटणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याचा सन्मान असल्याची भावना स्थानिक नागरिकांमधून व्यक्त होत आहे. या यशाबद्दल मुरूम शहरासह संपूर्ण धाराशिव जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, परिसरातील महिला व तरुण पिढीला यामुळे मोठी सामाजिक प्रेरणा मिळणार आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल राजकीय, सामाजिक, प्रशासकीय आणि शैक्षणिक क्षेत्रातील विविध मान्यवरांकडून रूपालीताई शिंदे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

डॉ. दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ, संचलित Reg. No. F-13138 (A)

DIAMOND CAREER ACADEMY
Dream • Dedication • Discipline

डायमंड करिअर अकॅडमी

सैन्य व पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र

यशाची १००% खात्री प्रवेश सुरू

निसर्गरम्य २ एकरच्या भव्य परिसरामध्ये नास्ता, जेवणासह निवासाची प्रशस्त व्यवस्था

प्रत्येक १५ दिवसाला डेमो भरती

* आमची वैशिष्ट्ये *

- तज्ञ शिक्षकांमार्फत मैदानी तयारी
- लेखी परिक्षेसाठी प्रत्येक विषयाला तज्ञ व अनुभवी शिक्षकवर्ग
- फिजिकलसाठी प्रशस्त मैदानी व्यवस्था
- गेस्ट लेक्चर्स ► प्रत्येक विद्यार्थ्यावर वैयक्तीक लक्ष
- लेक्चरसाठी सुसज्ज हॉल ► सोयीस्कर बॅचेस व निवासी सोय
- माफक फी व हप्त्याने भरण्याची सोय

आपला प्रवेश आजच निश्चित करा.







संचालक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार
(शैक्षणिक क्षेत्रातील २८ वर्षाचा प्रदिर्घ अनुभव)

रसुलपुरा, जटवाडा रोड, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)

9405109103 | 9270322952 | 8999094635

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०३ नोव्हेंबर २०२६

प्रा. राजीव शाळू सरांच्या ३१ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेचा गौरव; प्रतिभा निकेतन मध्ये उत्साहात सेवापूर्ती सोहळा संपन्न



(मुरूम, प्रा. सुधीर पंचगल्ले) : मुरुम येथील प्रतिष्ठित प्रतिभा निकेतन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील भौतिकशास्त्र विषयाचे प्रा. राजीव शाळू यांनी ३१ वर्षे ३ महिने शैक्षणिक क्षेत्रात निष्ठेने व निष्कलंक सेवा बजावली आहे. त्यांच्या या प्रदीर्घ आणि प्रेरणादायी शैक्षणिक सेवेच्या निमित्ताने विद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात सोमवारी (ता. २) त्यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा उत्साहात संपन्न झाला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य उल्हास घुरघुरे हे होते. यावेळी बोलताना प्राचार्य घुरघुरे म्हणाले, प्रा. शाळू यांनी आपल्या सेवाकाळात केवळ अभ्यासक्रम शिकवला नाही, तर अनेक डॉक्टर, अभियंते, उद्योजक तसेच विविध क्षेत्रांत देशपातळीवर उल्लेखनीय कार्य करणारे कर्तृत्ववान विद्यार्थी घडविले. विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी ठेवून त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी घेतलेली मेहनत आणि त्यांचा संपूर्ण शैक्षणिक प्रवास हा भावी पिढीसाठी अत्यंत प्रेरणादायी आहे, असे गौरवोद्गार त्यांनी काढले.या कार्यक्रमास प्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार, प्राचार्य डॉ. महेश्वर होगाडे, मुख्याध्यापक प्रेमनाथ आपचे, इरफान मुजावर, पर्यवेक्षक विवेकानंद परसाळगे आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच माजी प्राचार्य सच्चितानंद अंबर, काशिनाथ मिरगाळे, के. के. ब्याळे यांच्यासह परिसरातील आजी-माजी प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रारंभ स्वर्गीय माधवराव पाटील यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून महाराष्ट्र गीताने करण्यात आली. उपस्थित सर्वमान्यवरांच्या हस्ते प्रा. राजीव शाळू यांचा सपत्नीक सत्कार करून त्यांना कै. माधवराव पाटील यांची प्रतिमा भेट व पुढील यशस्वी आयुष्यासाठी भरभरून शुभेच्छा देण्यात आल्या. लक्ष्मी गाडेकर, सरोज गाडेकर, प्रा. अण्णाराव कांबळे, प्रा. अजित सूर्यवंशी, इरफान मुजावर आणि के. के. ब्याळे यांनी आपल्या मनोगतातून प्रा. शाळू यांच्या कष्टाळू स्वभावाचा आणि उत्कृष्ट अध्यापनशैलीचा गौरव केला.सत्काराला उत्तर देताना प्रा. राजीव शाळू यांनी आपल्या ३१ वर्षांच्या प्रदीर्घ कारकिर्दीतील सुखद आठवणी व विविध अनुभवांना उजाळा दिला. शिक्षक म्हणून काम करताना लाभलेले सहकारी, विद्यार्थी आणि संस्थेने वेळोवेळी दिलेले बहुमूल्य सहकार्य याबद्दल त्यांनी मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य उमाकांत महामुनी यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. सलीम जमादार तर प्रा. धर्माधिकारी राघवेंद्र यांनी आभार मानले. विद्यालयातील प्राध्यापक, सहशिक्षक, मित्रपरिवार, आप्तिष्ट-नातेवाईकांनी प्रा. शाळू सरांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा देत त्यांचा यथोचित सत्कार केला.

वसतिगृह शुल्कमाफीसाठी रिपब्लिकन विद्यार्थी सेनेचे निवेदन



छत्रपती संभाजीनगर : महाराष्ट्रासह संपूर्ण मराठवाड्यात निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीचा विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होणारा संभाव्य परिणाम लक्षात घेऊन वसतिगृह शुल्क माफ करावे,आकारण्यात आलेले वसतिगृह शुल्क परत करावे तसेच बंद असलेली सर्व वसतिगृहे तातडीने सुरू करावीत, अशा विविध मागण्यांचे निवेदन रिपब्लिकन विद्यार्थी सेनेच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. प्रवीण वक्ते यांना देण्यात आले यावेळी मराठवाड्यातील दुष्काळ, पाणीटंचाई, रोजगाराचा अभाव आणि उपजीविकेसाठी कुटुंबांचे होणारे स्थलांतर याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या आर्थिक व शैक्षणिक परिस्थितीवर होणारविद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले.दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर आर्थिक अडचणी, निवासाची समस्या आणि शैक्षणिक खर्चाचा वाढता भार यामुळे विद्यार्थ्यांची शैक्षणिक गळती, मानसिक तणाव तसेच शैक्षणिक आत्महत्यांसारख्या गंभीर प्रश्नांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक, मानसिक व आर्थिक संतुलन राखण्यासाठी विद्यापीठाने विशेष उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.विद्यापीठाच्या वसतिगृहात प्रवेशास पात्र असूनही जागेअभावी खासगी खोल्या व पीजीमध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांना वसतिगृह उपलब्ध करून द्यावे, डबल पीजी दुबार पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारण्याचा निर्णय तात्काळ रद्द करावा, हिवाळी व उन्हाळी सुट्ट्यांमध्ये वसतिगृह खाली करण्याची सक्ती करू नये, बंद वसतिगृहे सुरू करून त्यांची क्षमता वाढवावी, अशा मागण्याही करण्यात आल्या. तसेच आर्थिक अडचणी आणि निवासाच्या अभावामुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण अर्धवट राहू नये, यासाठी विशेष विद्यार्थी निवास सुरक्षा व शैक्षणिक गळती प्रतिबंधक उपाययोजना राबविण्याची मागणी करण्यात आली.दुष्काळाचा फटका विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाला बसू नये, ही विद्यापीठ प्रशासनाचीही सामाजिक जबाबदारी आहे.

त्यामुळे विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून या मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावेत, अशी मागणी रिपब्लिकन विद्यार्थी सेनेच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनात करण्यात आली आहे.यावेळी सचिन निकम, बाळू गायकवाड, कुणाल भालेराव, अतुल चव्हाण, प्रा.प्रबोधन बनसोडे, हनुमंत भाले आदींची उपस्थिती होती.

जिंतूरमध्ये ६५ घरकुल लाभार्थ्यांना प्रत्येकी एक लाखांचे अनुदान



जिंतूर (बी. डी. रामपूरकर) : प्रधानमंत्री आवास योजना २.० अंतर्गत जिंतूर नगर परिषद हद्दीतील पात्र घरकुल लाभार्थ्यांसाठी सोमवारी (दि. २ नोव्हेंबर) अनुदान वितरण व बांधकाम कार्यादेश वाटपाचा कार्यक्रम पार पडला. नगराध्यक्ष प्रतापराव विनायकराव देशमुख यांच्या हस्ते ६५ लाभार्थ्यांना प्रत्येकी एक लाख रुपयांचे अनुदान वितरित करण्यात आले.या योजनेअंतर्गत एकूण ६५ लाभार्थ्यांना प्रत्येकी एक लाख रुपये याप्रमाणे ६५ लाख रुपयांचे अनुदान देण्यात आले. तसेच घरकुल बांधकामासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केलेल्या २० लाभार्थ्यांना घरकुल बांधकामाचे कार्यादेशही प्रदान करण्यात आले. या निर्णयामुळे जिंतूर शहरातील गरजू कुटुंबांच्या स्वतःच्या घराचे स्वप्न साकार होण्यास मदत होणार असून, घरकुल योजनेच्या अंमलबजावणीला गती मिळणार आहे. अशी माहिती जिंतूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

जाहिरात दर

१.	पूर्ण पान (मल्टीकलर)	५०००/-
२.	अर्धे पान (मल्टीकलर)	३०००/-
३.	पाव पान (मल्टीकलर)	२०००/-
४.	शुभेच्छा जाहिरात	६००/-

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०३ नोव्हेंबर २०२६

६० एकल पालक विद्यार्थ्यांसह एकल निराधार महिला व यांना मदतीचा हात!



जिंतूर (बी. डी. रामपूरकर) : गावातील विद्यार्थ्यांना फराळ किट; ६० एकल पालक महिलांना साडी व किराणा साहित्य, निराधार विधवांनाही जीवनावश्यक किराणा किटचे वाटपजिंतूर : वडिलांचे छत्र हरवलेल्या विद्यार्थ्यांसह एकल पालक महिला आणि निराधार विधवांच्या चेहऱ्यावर दिवाळीचा आनंद फुलविण्याच्या सामाजिक बांधिलकीतून होमिओपॅथिक अकॅडमी ऑफ रिसर्च अँड चॅरिटीज (एचएआरसी), परभणी यांच्या वतीने आयोजित दिवाळी दानमहोत्सव २०२६ अंतर्गत जिंतूर तालुक्यात मदतकार्य राबविण्यात आले. या उपक्रमात २१ गावांतील ६० एकल पालक विद्यार्थ्यांना दिवाळी फराळ किट, ६० एकल पालक महिलांना साडी व फराळासाठी किराणा साहित्य, तसेच निराधार विधवा महिलांना जीवनावश्यक किराणा साहित्य किटचे वाटप करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. ब्रिजगोपाल तोष्णीवाल होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. दुर्गादास कानडकर आणि प्राचार्य डॉ. श्रीधर भोंबे उपस्थित होते. एचएआरसीचे अध्यक्ष डॉ. पवन चांडक, डॉ. शैलेश मंत्री, समन्वयक प्रकाश डुबे आणि संतोष बारबिंडे यांनी उपक्रमाचे नियोजन केले.जिंतूर तालुक्यातील कौसडी, बोरी, पुंगळा, पुंगळा तांडा, शेवडी, पाचलेगाव, डोणवाडा, बेलखेडा, निवळी खुर्द, सांगळेवाडी, वडाळी, वरूड, चिंचोली काळे, गाडदगव्हाण, ताठापूर, जोगवाडा, अंबिकावाडी, भोगावदेवी, कोलदंडी, चारठाणा आणि सावंगी म्हाळसा या २१ गावांतील गरजू लाभार्थ्यांची निवड करण्यात आली. स्थानिक शिक्षक व नागरिकांच्या सहकार्याने समन्वयक प्रकाश डुबे यांनी पात्र लाभार्थ्यांची माहिती संकलित केली.विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या दिवाळी फराळ किटमध्ये फरसाण मिक्सचर, शंकरपाळे, चकली, भाकरवडी, बालुशाही, सोनपापडी आणि शेव अशा सात प्रकारच्या फराळासह साबण, सुगंधी तेल, उटणे, दंतमंजन, टूथब्रश, कंगवा, चिक्की आणि पावडर या वस्तूंचा समावेश होता. एकल पालक महिलांना साडी व फराळासाठी किराणा साहित्य देण्यात आले. तसेच निराधार विधवा महिलांना साखर, खाद्यतेल, रवा, चणाडाळ, मैदा आणि पोहे अशा सहा प्रकारच्या जीवनावश्यक किराणा साहित्याचे किट देण्यात आले.समाजातील दानशूर व्यक्तींच्या सहकार्यातून हा उपक्रम राबविण्यात येत असून, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यांतील एकूण ४०० एकल पालक व अनाथ विद्यार्थ्यांपर्यंत दिवाळी साहित्य पोहोचविण्याचा संस्थेचा संकल्प असल्याचे एचएआरसीचे अध्यक्ष डॉ. पवन चांडक यांनी सांगितले.

वासडी येथे भदंत डॉ. दिपंकर थेरो यांचा कठिण चिवरदान सोहळा उत्साहात संपन्न



छत्रपती संभाजीनगर : कन्नड तालुक्यातील वासडी येथील पंचशील बुद्ध विहाराच्या वतीने पूजनीय भदंत डॉ. दिपंकर थेरो यांचा कठिण चिवरदान समारंभ रविवार, दि. १ नोव्हेंबर २०२६ रोजी विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनी उत्साहात संपन्न झाला. या सोहळ्याला विविध भागांतील भिक्खू संघासह बौद्ध उपासक-उपासिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. वर्षावासाच्या कालावधीत भदंत डॉ. दिपंकर थेरो यांनी पंचशील बुद्ध विहार, वासडी येथे भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथाचे वाचन केले. तसेच उपासक-उपासिकांना आनापानसती आणि महामंगल सुत्त याविषयी मार्गदर्शन केले. याशिवाय हस्ता, मेहगाव, पळशी खुर्द, खातखेडा, पिशोर, नेवपूर आणि धामणी आदी गावांमध्ये भिक्षाटन व धम्मचारिका करून बुद्ध धम्माचा प्रचार आणि प्रसार केला. पळशी खुर्द येथेही त्यांनी भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथाचे वाचन केले. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी धम्मध्वजारोहणाने झाली. त्यानंतर भिक्खू संघाला भोजनदान, त्रिशरण-पंचशील ग्रहण, भिक्खू संघाचे स्वागत आणि धम्मदेसना असे धार्मिक कार्यक्रम पार पडले. उपस्थित भिक्खू संघाने धम्मदेसनेतून भगवान बुद्धांचे विचार, धम्माचरण आणि दानपारमितेचे महत्त्व विशद केले. यावेळी भिक्खू संघाला कठिण चिवरासह दान अर्पण करण्यात आले. या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे साक्षी गवई या उपासिकेने सादर केलेले मी रमाई बोलते हे एकपात्री नाटक. या नाट्यप्रयोगातून त्यागमूर्ती रमाईंच्या जीवनातील संघर्ष, त्याग आणि योगदान प्रभावीपणे साकारण्यात आले. या सादरीकरणाला उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या सोहळ्याला तेलंगणा येथील भिक्खू राष्ट्रपाल महाथेरो, भिक्खू राहुल महाथेरो, भिक्खू यशोदिप थेरो, भन्ते विनयशील, भन्ते कल्याण धम्मो, भन्ते उप्पतिस्स, भन्ते राहुलराज, भन्ते संघरत्न आणि भन्ते लोकमित्र यांच्यासह भिक्खू संघाची उपस्थिती होती. तसेच बौद्धाचार्य व्ही. के. वाघ, मासिक धम्मसंपदाचे मुख्य संपादक कृष्णा साळवे, जे. एल. म्हस्के, भगवान गायकवाड, दादाराव आढावे, औरंगाबाद येथील पत्रकार अमरदिप हिवराळे आणि ॲड. प्रकाश वाल्हेकर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी पंचशील महिला मंडळ व भीमसैनिक मित्र मंडळाच्या सदस्यांसह उत्तम सोनवणे, गौतम नरवाडे, सुभाष पंडित, मारुती नरवाडे, राहुल पंडित, दिपक नरवाडे, कचरू सोनवणे, सागर नरवाडे, प्रभाकर पंडित, रुखमण नरवडे, सुनीता नरवाडे, मनिषा सोनवणे, सविता नरवडे, शांता नरवाडे आणि राजरत्न पंडित यांनी परिश्रम घेतले. शेवटी उपस्थित उपासक-उपासिकांसाठी भोजनदानाची व्यवस्था करण्यात आली होती. बुद्ध धम्मातील दान, शील आणि करुणा या मूल्यांचा संदेश देणारा हा कठिण चिवरदान सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)
विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T

Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

जिंतूर तालुक्यातील खोलगाडगा शिवारात बिबट्याचा वावर; गाईचे वासरू फस्त केल्याने शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण

जिंतूर (बी. डी. रामपूरकर) : तालुक्यातील खोलगाडगा शिवारात बिबट्याने धुमाकूळ घातला असून, एका गाईच्या वासराला फस्त केल्याची घटना घडली आहे। या घटनेमुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये तीव्र भीतीचे वातावरण पसरले असून, रब्बी हंगामातील पेरणी आणि शेतीच्या कामासाठी शेतात कसे जावे, असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर निर्माण झाला आहे. खोलगाडगा येथील शेतकरी अशोक जनार्दन घुकसे यांच्या गट क्रमांक 88 मधील शेतातील गोठ्यात बांधलेल्या गाईच्या वासरावर बिबट्याने हल्ला करून त्याला जागीच ठार केले। घटनेची माहिती मिळताच वनरक्षक सोनवणे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली। या पाहणीनंतर हा हल्ला बिबट्यानेच केल्याचा अंदाज त्यांनी वर्तवला असून, या परिसरात बिबट्याचा वावर वाढल्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे। शेतकऱ्यांमध्ये दहशतीचे वातावरणदुष्काळी परिस्थितीमुळे जंगलातील वन्यप्राणी अन्न व पाण्याच्या शोधात मानव वस्तीकडे आणि शेतशिवारात येत आहेत. खोलगाडगा शिवारात बिबट्याचा वावर असल्याच्या पुष्टीमुळे शेतकरी व ग्रामस्थांमध्ये दहशत निर्माण झाली आहे. सध्या रब्बी हंगामाची कामे आणि पेरणीची लगबग सुरू असताना, शेतकरी जीव मुठीत धरून शेतात जात आहेत. वनविभागाने या प्रकरणी तातडीने ठोस पावले उचलून बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी संतप्त शेतकरी करत आहेत.

ग्रामस्थांसाठी व शेतकऱ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना:प्रशासन व वनविभातर्फे परिसरातील नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे: आपल्या जनावरांना सुरक्षित ठिकाणी व बंदिस्त गोठ्यात बांधावे. रात्रीच्या वेळी जनावरांची विशेष काळजी घ्यावी. एकट्याने शेतात जाणे टाळावे. परिसरात बिबट्या किंवा संशयास्पद वन्यप्राणी दिसल्यास त्याच्या जवळ जाण्याचा प्रयत्न करू नये आणि तात्काळ वनविभागाला किंवा पोलीस पाटलांना माहिती द्यावी.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०३ नोव्हेंबर २०२६

स्वर्गाच्या शोधात माणूस आणि माणसाच्या शोधात बुद्ध!

मृत्यूनंतर स्वर्ग मिळेल, या आशेने माणूस आयुष्यभर पुण्याची कमाई करत असतो. कोणी उपवास करतो, कोणी दानधर्म करतो, कोणी तीर्थयात्रा करतो, तर कोणी देवाच्या दारात नवसांची पोती रचतो. जणू स्वर्ग ही काही पुण्याच्या गुणांवर मिळणारी हाऊसिंग सोसायटी आहे आणि मृत्यूनंतर तिथे फ्लॅट मिळवण्यासाठी माणूस आयुष्यभर पॉईंट्स जमा करत आहे!पण एक प्रश्न मनाला अस्वस्थ करतो. स्वर्ग मिळवण्यासाठी माणूस एवढी धडपड करतो, मग याच पृथ्वीवर स्वर्ग निर्माण करण्यासाठी तो काय करतो?इतिहासात एक राजपुत्र होऊन गेला. त्याच्याकडे राजवाडा होता, संपत्ती होती, सत्ता होती, सुंदर परिवार होता, सुखसोयींची कमतरता नव्हती. जगातील सामान्य माणूस ज्या सुखासाठी आयुष्यभर धडपडतो, ते सुख त्याच्या पायाशी होते. तरीही त्याच्या मनात एक प्रश्न निर्माण झाला—माणूस दुःखी का आहे? त्याला वृद्धत्व का येते? आजार का होतात? मृत्यू का येतो? माणसाच्या दुःखाचे मूळ नेमके कुठे आहे?या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी सिद्धार्थ गौतमाने राजमहाल सोडला.विचार करा, ज्याच्याकडे सर्व काही होते, त्याने सुखाच्या शोधात नव्हे, तर दुःखाच्या कारणाच्या शोधात राजवैभवाचा त्याग केला. त्याला स्वतःसाठी स्वर्ग नको होता; त्याला माणसाच्या दुःखातून मुक्तीचा मार्ग शोधायचा होता.आणि आजचा माणूस?त्याच्याकडे राजवाड्यापेक्षाही सुंदर घरे आहेत, राजांच्या सेवकांपेक्षा अधिक सुविधा देणारी यंत्रे आहेत, जगभरातील माहिती हातात आहे; पण मनःशांती मात्र हरवली आहे.दोनशे वर्षांपूर्वीचा एखादा राजा आजच्या सामान्य माणसाच्या घरात आला, तर त्याला आश्चर्य वाटेल. बटण दाबले की प्रकाश, दुसरे बटण दाबले की थंड हवा, नळ उघडला की पाणी, मोबाईल उघडला की संपूर्ण जग समोर!विज्ञानाने माणसाला अद्भुत सुविधा दिल्या आहेत. पण या सुविधांनी माणसाला सुखी केले की केवळ अपेक्षांची भूक वाढवली?AC असूनही समाधान नाही. गाडी असूनही तृप्ती नाही. स्वतःचे घर असूनही शेजाऱ्याच्या बंगल्याचा हेवा. स्वतःचे आयुष्य विसरून दुसऱ्याच्या आयुष्याचा हिशोब करण्यातच माणूस गुंतला आहे.माणसाची विचित्र मानसिकता अशी की, जे मिळाले आहे त्याची किंमत त्याला राहत नाही आणि जे मिळालेले नाही त्यासाठी तो आयुष्यभर अस्वस्थ राहतो.याच संदर्भात रेमंडच्या मालकाबद्दल एक कथा समाजात सांगितली जाते. अफाट संपत्ती, उद्योगविश्वातील मोठे नाव आणि प्रचंड आर्थिक सामर्थ्य असूनही वृद्धापकाळात वृद्धाश्रमात एकाकी अवस्थेत त्याचा अंत झाला, असे या कथेत सांगितले जाते.या कथेतून एक प्रश्न मात्र नक्की उभा राहतो—संपत्तीने बंगले विकत घेता येतात, पण आपुलकी विकत घेता येते का? पैशाने माणसांची गर्दी जमवता येते, पण मनापासून सोबत करणारी माणसे विकत घेता येतात का? जग जिंकता येते, पण स्वतःच्या माणसांच्या मनात जागा निर्माण करता येते का?एकीकडे बुद्धाने दुःखाचे मूळ शोधण्यासाठी राजमहाल सोडला आणि दुसरीकडे माणूस आयुष्यभर राजमहाल उभा करण्यासाठी धडपडत राहिला.हा विरोधाभास समजून घेण्याची गरज आहे.पण इथेच थांबून चालणार नाही. कारण सुख आणि दुःखाचा प्रश्न केवळ मानसिकतेचा नाही; तो सामाजिक विषमतेचाही आहे.आपण म्हणतो, कृतज्ञ राहा! जे आहे त्यात आनंदी राहा! पण ज्याच्या घरात पिण्याचे पाणी नाही, त्याने कोणाचे आभार मानावेत? ज्याच्या मुलांनी उपाशीपोटी झोपावे, त्याला कोणत्या स्वर्गाचा अनुभव घ्यायला सांगणार? ज्याच्याकडे शिक्षणासाठी साधा मोबाईल नाही, त्याला केवळ दृष्टिकोन बदलण्याचा उपदेश पुरेसा आहे का?ज्याच्या घरात अन्न आहे, त्याने अन्नाची किंमत जाणावी, हे योग्यच. पण ज्याच्या घरात चूल पेटत नाही, त्याला समाधानाचे तत्त्वज्ञान शिकवून काय उपयोग?भुकेल्याला संयम शिकवणारे अनेक आहेत; पण त्याच्या ताटात अन्न वाढणारे किती? गरिबाला सहनशीलतेचे धडे देणारे अनेक आहेत; पण त्याच्या गरिबीचे कारण शोधणारे किती? झोपडीत राहणाऱ्याला समाधानाचा उपदेश करणारे अनेक आहेत; पण त्याला सन्मानाचे घर मिळावे म्हणून लढणारे किती?गरिबीचे उदात्तीकरण करणे म्हणजे गरिबी संपवणे नव्हे. अन्याय सहन करण्याला संस्कार म्हणणे म्हणजे माणुसकी नव्हे.म्हणूनच कृतज्ञतेचा विचार महत्त्वाचा असला, तरी तो अन्यायाविरुद्धच्या संघर्षाला पर्याय होऊ शकत नाही.बाबासाहेब आंबेडकरांनी माणसाला स्वाभिमानाने जगण्याचा अधिकार दिला. महात्मा फुले यांनी शिक्षणातून गुलामगिरीच्या बेड्या तोडण्याचा मार्ग दाखवला. बुद्धांनी दुःख समजून घेण्याची आणि त्यातून मुक्त होण्याची प्रज्ञा दिली.या महामानवांच्या विचारांचा अर्थ केवळ स्वतःच्या मनाला शांत ठेवणे नाही; तर समाजातील प्रत्येक माणसाला सन्मानाने जगता येईल अशी व्यवस्था निर्माण करणे हाही आहे.मला वाटते, स्वर्ग आणि नरक यांची व्याख्या आपण नव्याने केली पाहिजे.जिथे मुलांना भुकेने झोपावे लागत नाही, जिथे स्त्री सुरक्षित आहे, जिथे जात माणसाची किंमत ठरवत नाही, जिथे शिक्षण हा श्रीमंतांचा विशेषाधिकार नसून प्रत्येकाचा अधिकार आहे, जिथे वृद्ध आई-वडिलांना निराधार होऊन जगावे लागत नाही, जिथे माणसाला माणूस म्हणून सन्मान मिळतो—तिथे स्वर्ग आहे.आणि जिथे माणसाची जात पाहून त्याला पाणी नाकारले जाते, जिथे गरिबीमुळे शिक्षण नाकारले जाते, जिथे वृद्ध आई-वडिलांना ओझे समजले जाते, जिथे संपत्तीला माणुसकीपेक्षा अधिक महत्त्व दिले जाते—तिथे नरक आहे.मग प्रश्न असा आहे की, आपण स्वर्गाच्या शोधात नेमके कुठे भटकत आहोत?मृत्यूनंतरच्या स्वर्गासाठी पुण्य जमा करताना जिवंत माणसाच्या दुःखाकडे दुर्लक्ष करत आहोत का?मंदिरात दानपेटीत पैसे टाकताना रस्त्यावरच्या भुकेल्या माणसाला पाहून आपली नजर का वळते? देवाच्या चरणी फुले वाहताना वृद्ध आई-वडिलांच्या चेहऱ्यावरचे दुःख का दिसत नाही? तीर्थयात्रा करताना माणुसकीची यात्रा का विसरतो?बुद्धाने राजमहाल सोडला, कारण त्याला माणसाच्या दुःखाचा शोध घ्यायचा होता. आज आपण राजमहाल उभे करण्यासाठी धडपडतो आहोत; पण त्या महालात माणुसकीसाठी किती जागा ठेवतो आहोत?माझ्या मते, खरी श्रीमंती बँकेच्या खात्यात नसते; ती माणसांच्या मनात असते. खरे वैभव सोन्याच्या दागिन्यांत नसते; ते नात्यांच्या विश्वासात असते. आणि खरा स्वर्ग उंच इमारतीत नसतो; तो माणसाला माणूस म्हणून जगू देणाऱ्या समाजात असतो.म्हणून रात्री झोपण्यापूर्वी आज मला पाच गोष्टींचा हिशोब करायचा आहे.आज मला अन्न मिळाले का? आज माझ्या डोक्यावर छप्पर होते का? आज माझ्या माणसांनी माझी विचारपूस केली का? आज मी कुणाचे दुःख कमी केले का? आणि सर्वांत महत्त्वाचे—आज माझ्यामुळे कोणाचे आयुष्य थोडे अधिक सन्मानाचे झाले का?कारण केवळ स्वतःच्या सुखाचा आनंद घेणे ही जगण्याची एक बाजू आहे; दुसऱ्याच्या दुःखात सहभागी होणे ही माणुसकीची खरी परीक्षा आहे.शेवटी एवढेच...बुद्धाने राजमहाल सोडला, कारण त्याला माणसाच्या दुःखाचे कारण शोधायचे होते. आपण मात्र आयुष्यभर महाल बांधण्यात गुंतलो आहोत; पण त्या महालात माणुसकीसाठी जागा ठेवायला विसरलो आहोत.स्वर्ग मृत्यूनंतर मिळतो की नाही, हे कुणालाच माहीत नाही. पण पृथ्वीवर नरक निर्माण करण्याची ताकद माणसाकडे आहे आणि त्याच पृथ्वीवर स्वर्ग निर्माण करण्याची ताकदही माणसाकडेच आहे.मला मृत्यूनंतरचा स्वर्ग नको, मला जिवंतपणी माणुसकीचा स्वर्ग हवा आहे.जिथे माणूस उपाशी नाही, अपमानित नाही, असुरक्षित नाही, एकाकी नाही आणि जात-धर्माच्या भिंतीत कैद नाही—असा समाज निर्माण झाला, तर कदाचित बुद्धाला शोधण्यासाठी पुन्हा राजमहाल सोडण्याची गरजच उरणार नाही!

डॉ. बाळासाहेब बा. लिहिणार
७७४१८ ०७०६८

